RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २५(३)] मंगळवार, एप्रिल १७, २०१८/चैत्र २७, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे सचिव कार्यालय**

राजभवन, मलबार हील, मुंबई ४०० ०३५, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१६

**उद्देशिका**

**भारताचे संविधान.**

क्र. आरबी/टीसी/ई-११०१९(३३)(२०१५)/इजीजी/१४७५/२०१६.— महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी काढलेली पुढील अधिसूचना सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे :—

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) अन्वये, राज्यपाल यांना जाहीर अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा एखादा विशिष्ट अधिनियम त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असणार नाही अथवा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये, कुपोषणाच्या घटनांचे निर्मूलन होईल आणि अनुसूचित क्षेत्रातील बालकांना वाढ खुंटणे, अनारोग्य आणि बालमृत्यू यांस सामोरे जावे लागणार नाही, याची सुनिश्चिती करण्यासाठी पुरेसे पोषक अन्न पुरविण्याची गरज आहे ;

**आणि ज्याअर्थी,** बाल कुपोषणाच्या मूळ कारणाचे उच्चाटन करण्यासाठी गरोदर महिला व स्तन्यदा माता यांना पुरेसा पोषण आहार देण्याची गरज आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अंड्यामध्ये अनेक पोषक घटक असतात आणि ते आरोग्यास मोठ्या प्रमाणात गुणकारी असलेले पूर्णान्न म्हणून ओळखले जाते ;

**आणि ज्याअर्थी,** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ चे कलम ३२, या खालील तरतूद, असलेल्या लाभांपेक्षा अधिक लाभ देण्याची अन्न आधारित कल्याणकारी योजना, स्वतःच्या मालकीच्या साधनसंपत्तीमधून चालू ठेवण्यास किंवा तयार करण्यास, राज्य शासनास अनुमती देते ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ व ५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र शासनाने, जनजाति उपयोजना क्षेत्रामध्ये अनुक्रमे, गरोदर महिला व स्तन्यदा मातांना दररोज " एका वेळेचे संपूर्ण भोजन " आणि सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा एक अंडे देण्याची तरतूद केली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांना उपरोक्त योजना राबविताना सातत्य राखण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ या मध्ये महाराष्ट्राच्या अनुसूचित क्षेत्रासाठी तो लागू करताना, त्या योजना समाविष्ट करणे इष्ट वाटते ;

**त्याअर्थी आता,** भारताच्या संविधानाच्या याच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे पुढील अधिसूचना काढीत आहेत :—

**अधिसूचना**

**भारताचे संविधान**

भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे असा निदेश देत आहे की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ पुढील फेरबदलांसह, अनुसूचित क्षेत्रासाठी लागू असेल :—

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ यातील फेरबदल**

(एक) कलम ४ मधील खंड (क) मध्ये,

(क) " भोजनासाठी " या मजकुराऐवजी " अंडी आणि गरम शिजवलेले भोजन यासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) च्या शेवटी येणारा " आणि " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल,

" परंतु, राज्य शासन अनुसूचित क्षेत्रामध्ये स्तन्यदा माता व गरोदर महिला यांना गरम शिजवलेले भोजन पुरविण्याकरिता करावयाचा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद करील; आणि ";

(दोन) कलम ५ मधील, पोट- कलम (१) मधील परंतुकानंतर पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :

" परंतु आणखी असे की, कलम ५ च्या पोट- कलम (१) मधील खंड (क) च्या तरतुदीव्यतिरिक्त, महाराष्ट्राच्या अनुसूचित क्षेत्रामधील अंगणवाड्यातील ७ महिन्यापेक्षा अधिक आणि ६ वर्षे वयापर्यंतच्या बालकांना, अतिरिक्त जिन्नस म्हणून आठवड्यातून किमान ४ वेळा अंडी पुरविण्यात येतील :

परंतु असेही की, अनुसूचित क्षेत्रांमधील ज्या बालकांना अंडी नको असतील त्यांना अंड्याऐवजी योग्य पर्यायी भोजन आठवड्यातून किमान ४ वेळा पुरविण्यात येईल :

परंतु तसेच, राज्य शासन अनुसूचित क्षेत्रांमध्ये बालकांना अंडी पुरविण्याकरिता करावयाचा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद करील ";

(तीन) अधिनियमाच्या अनुसूची दोनमध्ये, स्तंभ (३) च्या अनुक्रमांक ६ वरील नोंदीतील " घरी नेण्याचा शिधा " या मजकुराऐवजी " गरम शिजलेले भोजन " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
राज्यपालांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.